महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीची (महानिर्मिती) भुसावळ संच क्र.४ व ५ संबंधीत प्रकल्पाची भांडवली किंमत तसेच आर्थिक वर्षे २०१३-१४ ते २०१५-१६ साठीचा वीजदर निश्चितीकरण आणि आ.व.२०१२-१३ व २०१३-१४ चे समायोजनाकरीता याचिका

# (प्र.क्र.२०१ चे वर्ष २०१४)

# कार्यकारी सारांश

# कार्यकारी सारांश

## १.प्रकल्पाचा आढावा:

महाराष्ट्र राज्यातील विजनिर्मिती क्षमता वाढवण्यासाठी महानिर्मितीने कसोशीने केलेल्या प्रयत्नांतर्गत प्रत्येकी ५०० मे.वॅट स्थापीत क्षमता असलेले भुसावळ संच क्र.४ दि. १६ नोव्हेंबर, २०१२ रोजी आणि भुसावळ संच क्र. ५ हा दि. ०३ जानेवारी,२०१४ रोजी कार्यान्वीत करण्यात आला. हया संचातून निर्माण होणारी वीज ही महावितरण कंपनीला पूरवली जात आहे.

महानिर्मितीने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६१, ६२ आणि ८६(१)(अ)(ब) आणि वीज नियामक आयोगाच्या (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ चा भाग ई आणि आयोगाच्या (बहु-वर्षीय वीजदर) विनियम २०११ चा भाग क अन्वये मा. आयोगासमोर ही याचिका सादर केली आहे यात भुसावळ संच क्र.४ व ५ करीता भांडवली खर्च आणि भुसावळ संच क्र.४ करीता वार्षिक महसुलाची गरज व आ.व. २०१२-१३ व २०१३-१४ चा वीजदर (भुसावळ संच क्र. ५ कार्यान्वित होईपर्यंत) आणि (भुसावळ संच क्र.५ कार्यान्वित झाल्यानंतर) भुसावळ संच क्र.४ व ५ साठी आ.व.२०१३-१४ ते आ.व.२०१५-१६ पर्यंत एकत्रित वार्षिक महसुलाची गरज व वीजदर निश्चिती यांचा समावेश आहे.

## २.प्रकल्पाचा भांडवली खर्च:

पारदर्शकता आणि किमतीतील स्पर्धात्मकता असावी याकरिता, महानिर्मितीने हया प्रकल्पाचे मुख्य संयंत्र आणि त्याच्याशी निगडीत साहाय्यकारी आणि इतर प्रणाली विकत घेण्यासाठी स्पर्धात्मक बोली प्रक्रीयेद्वारे निवीदा मागविण्याचा मार्ग स्विकारला. हया प्रक्रीयेच्या अनुरोधाने मुख्य संचाच्या पुरवठा आणि उभारणी चे कंत्राट मे. भारत हेवी इलेक्ट्रीकल कंपनीला देण्यात आले.देशांतर्गत स्पर्धात्मक बोलीद्वारे मे.टाटा पॉवर कंपनीला इतर संयंत्राच्या (Balance of Plant), उभारणीसाठी इमारत आणि स्थापत्य कामांचे कंत्राट दिले गेले. उरलेली स्थापत्य कामे जसे की, रेल्वे साईडींग, कर्मचा-यांची घरे इत्यादी करीता इतर कंत्राटदारांना कंत्राट दिले.

विज विनियमाप्रमाणे प्रकल्पाची भांडवली किंमत ही मा.आयोगाच्या आवश्यक छाननी नंतर, प्रकल्प व्यापारी तत्वावर चालविण्याच्या घोषीत तारखे पर्यंत झाालेल्या प्रत्यक्ष खर्चावर आधारीत असते. संबंधीत संचांचा व्यापारी तत्वावर चालवण्याच्या घोषित तारखे पर्यंत भांडवली खर्चाचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.

| भांडवली किंमतीचे घटक | भांडवली किंमत (रू.कोटी) | | |
|---|---|---|---|
| | संच क्र.४ | संच क्र.५ | संच क्र.४ आणि ५ |
| | १६ नोव्हेबर, २०१२ रोजी | ०३ जानेवारी, २०१४ रोजी | ०३ जानेवारी, २०१४ रोजी |
| जमिन आणि विकास किंमत | ४१.५१ | ५.८३ | ४७.३३ |
| बाष्पक,चलित्र,जनित्र | १३६९.०९ | १३८६.९८ | २७५६.०८ |
| इतर यंत्र सामूग्री | ७७१.२७ | १६०.५७ | ९३१.८४ |

| | | | |
|---|---|---|---|
| स्थापत्य कामे | ७५०.७८ | ३६२.४३ | १११३.२१ |
| संच उभारणीच्या काळातील इंधन खर्च | -३६.९३* | ६७.०० | ३०.०८ |
| उपरी खर्च | ६९.६७ | ६४.७९ | १३४.४५ |
| उपकरणे आणि नियंत्रण | ६१.८५ | २५.०९ | ८६.९४ |
| उभारणी काळातील व्याज | ९५२.९५ | ६७७.४६ | १६३०.४० |
| **एकूण** | **३९८०.१९** | **२७५०.१५** | **६७३०.३३** |

** अनिश्चित विजेच्या विक्रीतुन मिळालेला महसुल हा उभारणी काळातील प्रत्यक्ष इंधन खर्चा पेक्षा जास्त आहे.*

## ३. वित्तीय नियोजन:

महानिर्मितीने नविन संच निर्मिती करीता रूरल इलेक्ट्रीक कार्पोरेशन कडून दिर्घमुदतीचे कर्ज घेतले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने भागभांडवल म्हणून रू. १२९२.९९ कोटी चे योगदान दिले आहे. संच व्यापारी तत्वावर चालवण्याच्या तारखेपर्यंत (CoD) एकत्रीत निधीचे उपयोजन खालील तक्त्यात नमूद केले आहे.

| **तपशील** | **संच क्र.४ व्यापारी संचालन तिथीला** | | **संच क्र.५ व्यापारी संचालन तिथीला** | | **एकुण** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **किंमत (रू.कोटी)** | % | **किंमत (रू. कोटी)** | % | **किंमत (रू. कोटी)** | % |
| कर्ज | ३१८४.१५ | ८०% | १७६४.५६ | ७८.८६% | ४९४८.७१ | ७९.५९% |
| शासनाचे भागभांडवल | ७९६.०४ | २०% | ४७३.०५ | २१.१४% | १२६९.०९** | २०.४१% |
| अमुक्त दायीत्व* | ०.०० | | ५१२.५३* | | ५१२.५३* | |
| **एकूण** | **३९८०.१९** | १००% | **२७५०.१४** | १००% | **६७३०.३३** | १००% |

*****संच क्र. ५ च्या व्यापारी तत्वावर चालवण्याच्या तारखेपर्यंत (CoD) रू. ५१२.५३ कोटी चे अनिधीगत/अमुक्त दायित्वासाठी निधी विचारात घेतलेला नाही. अपेक्षित नुकसान भरपाईची राखून ठेवलेली रक्कम साधारणत: रू. ३३९.५४ कोटी हया दायित्वातून वगळून बाकी दायित्व आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये मुक्त करण्याची शक्यता आहे.

** शासनाने दिलेल्या रू. १२९२.९९ कोटी योगदाना पैकी १२६९.०९ कोटी रू. खर्च झाला असून उरलेली रक्कम रू. २३.९० कोटी संच व्यापारी तत्वावर चालवण्याच्या तारखे नंतर अतिरीक्त भांडवली खर्चासाठी वापरली जाईल.

## ४. प्रकल्प पूर्णत्वाचा काळ आणि निर्धारीत नुकसान भरपाई.

महानिर्मितीने संच क्र.४ चे चाचणी संचालन ४३ महीने व संच क्र.५ चे ४७ महीने अशा कमीत कमी काळात प्रकल्प पूर्ण करण्याचे उदिष्ट ठेवले होते. मे. भेल यांनी कंत्राट करारा प्रमाणे खालील वेळापत्रक मान्य केले.

| | **भुसावळ संच क्र ४** | **भुसावळ संच क्र.५** |
|---|---|---|
| **संच सिंक्रोनायझेशन** | ४० महीने | ४४ महिने |
| **चाचणी संचालन** | ४३ महीने | ४७ महीने |

संचाच्या प्रत्यक्ष चाचणी संचालनाचे वेळापत्रक, आधी निर्धारीत वेळेपेक्षा लांबल्यामुळे प्रत्यक्ष चाचणीला जास्त वेळ लागल्याची सखोल कारणमीमांसा हया याचिकेत दिली आहे. महानिर्मितीने कंत्राट कराराप्रमाणे विविध कंत्राटदारांचे, भुसावळ संच क्र.५ **च्या** व्यापारी संचालन तिथी पर्यंत सुमारे ३३९.५४कोटी रू. (Liquidated damages)नुकसान भरपाई पोटी राखून ठेवले आहेत.

## आ.व.२०१२-१३ ते २०१५-१६ करीता एकूण महसूलाची आवश्यकता.

### १) स्थिर आकार

स्थिर आकाराची गणना ही भुसावळ संच क्र.४ ची भांडवली किंमत रू. ३९८०.१९ कोटी आणि संच क्र.५ करीता रू.२७५०.१४ कोटी एवढी विचारात घेउन केली आहे. हया वीजकेंद्राच्या दोन्ही संचांमध्ये काही सामायीक सुविधा जसे की, पाणी शुध्दीकरण विभाग, कोळसा हाताळणी विभाग, राख हाताळणी विभाग आणि प्रयोगशाळेतील उपकरणे हया आहेत. परंतु प्रथम संचाच्या व्यापारीतत्वावर चालवण्याच्या तारखेला वरील सर्व सामायिक सुविधा कार्यान्वित होणे आवश्यक असते. हया कारणांमूळे सामायिक साधन सामूग्रीवर रू. १५०४.५१ कोटी झालेला खर्च हा भूसावळ संच क्र.४ च्या भांडवली खर्चातच अर्तभुत केला आहे. (सामुहीक साधन सामुग्रीची यादी परिशिष्ट दोन मध्ये दिली आहे.)

याचिकेत दिलेले अतिरीक्त भांडवलीकरण हे वीजदर ठरवतांना विचारात घेतले आहे. संच क्र.५ ला व्यापारी संचालन तारखेपर्यंत (CoD) रू. ५१२.१३ कोटी चे अमुक्त/अनिधीमत दायित्वासाठी निधी विचारात घेतलेला नाही. नुकसान भरपाईची धारणा रक्कम साधारणत: रू.३३९.५४ कोटी वरील दायित्वातून वगळून बाकी दायित्व आ.व.२०१५-१६ मध्ये मुक्त करण्याची शक्यता आहे. स्थिर आकाराचे घटकांची गणना खालील प्रमाणे केली आहे.

**अ. संचालन व सुव्यवस्था खर्च :** प्रमाणकानूसार (प्रचलीत विनियमानुसार रू.लक्ष प्रति मे.वॅ जसे खापरखेडा संच क्र.५(५०० मे.वॅ.) करीता मान्य केल्या प्रमाणे)

**ब. घसारा** : वीज विनियमात घसाराच्या अनुसूचीत दिलेल्या दराप्रमाणे

क. **<u>दिर्घकालीन कर्जावरील व्याज</u>** : आयोगाच्या (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम,२००५ प्रमाणे प्रत्यक्ष दिलेले व्याज आणि (बहु-वर्षीय वीजदर) विनियम २०११ प्रमाणे प्रमाणीत व्याज

ड. **खेळत्या भांडवलावरील व्याज** : प्रमाणकानूसार आणि प्रमाणीत व्याजदर लावून(याचिका दाखल केलेल्या तारखेला भारतीय स्टेट बॅंकेचा मूख्य कर्ज व्याजाचा दर)

इ. **<u>भाग भांडवलावरील परतावा</u>** : विनियमाप्रमाणे आ.व.२०१२-१३ करिता १४ टक्के आणि तदनंतर वर्षाच्या सुरवातीच्या भागभांडवलावर १५.५ टक्के

फ. **<u>आयकर</u>** : आ.व. २०१२-१३ करीता कुठलेही आयकर दायीत्व विचाराधीन नाही. (महानिर्मितीच्या प्रकरण क्र. १२२/२०१४ आ. व. २०१२-१३ च्या समायोजनाच्या याचिके मध्ये विचाराधीन आहे). आयकर दायित्व आ.व. २०१३-१४ साठी व पुढे मॅट दर २०.०१ टक्के प्रमाणे गृहीत धरला आहे.

## २) <u>वीज आकार</u>

भुसावळ संच क्र.४ च्या व्यापारी संचालन तिथीला महानिर्मितीचा मे. एमसीएल कंपनी बरोबर २.७७४४ द.ल.मे.टन देशी कोळसा पूरवठा सामंजस्य करार होता. तदनंतर महानिर्मितीने मे. एमसीएल (MCL) सोबत जवळपास ४००० किलोकॅलरी प्रती किलो उष्मांक असलेला ४.६२४ द.ल.टन. कोळसा पूरवठा करार केलेला आहे. ही कोळसा पुरवठा कराराची मात्रा ८६ टक्के भारांक देउ शकेल एवढी आहे. परंतु कोळसा पूरवठा कराराच्या पश्चात कराराच्या ४० टक्के मात्रा आणि कमी उष्मांक असलेला प्राप्त कोळसा हा ३४.५७ टक्के संयंत्र भारांकापूरताच आहे.

हया वीजकेंद्राची कामगीरी वाढवण्याकरीता महानिर्मितीने ३१ ऑगस्ट,२०१३ रोजी मे. नॉलेज इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. सोबत १.१४८ द.ल.मे.टन आयात कोळसा पूरवठयाचा करार केला. महानिर्मितीने नुकताच आयात कोळसा पूरवठयासाठी नविन करार केला आहे. हया प्रमाणे आ.व. २०१५-१६ करीता प्रमाणीत घटकांची पूर्तता करण्याकरीता देशी कोळसा व आयात कोळशाच्या उष्मांकाचे प्रमाण ७५:२५ गृहीत धरले आहे.

**आ.व. २०१२-१३ ते आ.व.२०१५-१६ करीता एकुण महसुलाची गरजेचा प्रक्षेपीत गोषवारा खालील तत्क्यात दिला आहे.**

| तपशील | एकक | आर्थिक वर्ष २०१३ | आर्थिक वर्ष २०१४ | आर्थिक वर्ष २०१५ | आर्थिक वर्ष २०१६ |
|---|---|---|---|---|---|
| | | संच क्र.४ | संच क्र.४ आणि ५ | संच क्र.४ आणि ५ | संच क्र.४ आणि ५ |
| | | (प्रत्यक्ष) | (प्रत्यक्ष) | (अंदाजित) | (प्रक्षेपित) |
| घसारा | रू.कोटी | ५१.६९ | २३७.७८ | ३५४.४४ | ३६१.३१ |
| घसारा वरील अग्रीम | रू.कोटी | ०.०० | लागू नाही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | रू.कोटी | २६.५४ | ६७.८२ | १९०.८४ | २०६.७८ |
| दिर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | रू.कोटी | १३९.२० | ४२७.३२ | ५७६.४५ | ५५४.८७ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | रू.कोटी | २०.०० | ६४.९५ | १०३.२० | ११०.०९ |
| भाग भांडवलावरील परतावा | रू.कोटी | ४१.५२ | १४१.०६ | २००.४१ | २१४.५० |
| आयकर | रू.कोटी | ०.०० | ०.०० | ४२.०१ | ४४.९६ |
| वजा (-) इतर उत्पन्न | रू.कोटी | ०.१३ | ३.८५ | ६.५६ | ४.८७ |
| **एकूण स्थिर आकार** | रू.कोटी | २७८.८२ | ९३५.०८ | १४६०.७९ | १४८७.६४ |
| **एकूण अस्थिर आकार** | रू.कोटी | २९९.९३ | ९०१.७० | १६२७.९७ | १७९०.६८ |
| **एकूण आकार** | रू.कोटी | ५७८.७५ | १८३६.७८ | ३०८८.७६ | ३२७८.३२ |

महानिर्मिती मा. आयोगाला अशी विनंती करते की, हया याचिकेमध्ये सादर केलेल्या कारण मिमांसेवर आधारीत प्रकल्प किंमत व वीजदर मान्य करावा.

## ५. आ.व.२०१२-१३ आणि २०१३-१४ चे समायोजन

वरील तक्त्यात दिल्याप्रमाणे आ.व. २०१२-१३ आणि २०१३ -१४ करीता अनुक्रमे रू.५७८.७५ कोटी आणि रू. १८३६.७८ कोटी प्रत्यक्ष खर्च झाला आहे. महानिर्मितीने समायोजनाकरीता मा.आयोग प्रत्यक्ष भांडवली खर्च मान्य करेल असे गृहीत धरले आहे. हया गृहीतका प्रमाणे व विनियमानूसार संचलन सुव्यवस्था खर्च आणि इंधन खर्च व त्या अनुशंगाने खेळत्या भांडवलावरील व्याज हे प्रमाणकानुसार केले असून त्यानंतर नफा व तोटयाची विभागणी केली आहे. तसेच महावितरण कंपनीला अनुक्रमे आ.व. २०१२-१३ आणि २०१३ -१४ करीता रू.४४९.३२ कोटी व रू.१३३२.५३ कोटी ची वीज देयके महानिर्मिती कंपनीने दिली आहेत.

वरील बाबी लक्षात घेउन गेल्या दोन वर्षात कार्य क्षमतेतील लाभ किंवा तोटा व कमी उपलब्धतेमूळे स्थिर आकारात घट विचारात घेउन एकत्रीत महसुलातील तफावत खालील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता: आ.व. २०१२-१३ आणि २०१३ -१४ चे समायोजन**

| | आ.व.२०१२-१३ | | | | आ.व.२०१३-१४ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तपशील | प्रत्यक्ष | प्रमाणकानुसार | तफावत | निव्वळ हक्क नफा किंवा तोटा विभागणी केल्या नंतर | प्रत्यक्ष | प्रमाणकानुसार | तफावत | निव्वळ हक्क नफा किंवा तोटा विभागणी केल्या नंतर |
| घसारा | ५१.६९ | ५१.६९ | ०.०० | ५१.६९ | २३७.७८ | २३७.७८ | ०.०० | २३७.७८ |
| घसारा वरील अग्रीम | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ० | ० | ०.०० | ०.०० |
| संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | २६.५४ | ३०.२९ | ३.७५ | २९.०४ | ६७.८२ | १०९.३ | ४१.४८ | ९५.४७ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १३९.२० | १३९.२० | ०.०० | १३९.२० | ४२७.३२ | ४२७.३२ | ०.०० | ४२७.३२ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | २०.०० | १९.८८ | | १९.८८ | ६४.९५ | ६०.०४ | ०.०० | ६०.०४ |
| भाग भांडवलावरील परतावा | ४१.५२ | ४१.५२ | ०.०० | ४१.५२ | १४१.०६ | १४१.०६ | ०.०० | १४१.०६ |
| आयकर | ०.०० | ०.०० | ००० | ०.०० | ० | ० | ०.०० | ०.०० |
| वजा (-) इतर उत्पन्न | ०.१३ | ०.१३ | ०.०० | ०.१३ | ३.८५ | ३.८५ | ०.०० | ३.८५ |
| एकूण स्थिर आकार | २७८.८२ | २८२.४५ | ३.६३ | २८१.२० | ९३५.०५ | ९७१.६५ | ३६.६० | ९५७.८२ |
| एकूण अस्थिर आकार | २९९.९३ | २९४.००[१] | -५.९३ | २९५.९८ | ९०१.७ | ८०३.८५[१] | -९७.८५ | ८३६.४७ |
| एकूण आकार | ५७८.७५ | ५७६.४५ | -२.३० | ५७७.१८ | १८३६.७८ | १७७५.५० | -६१.२५ | १७९४.२९ |
| कमी उपलब्धतेमूळे स्थिर आकारात घट[१] | | | | ७१.७८ | | | | २८६.०० |
| निव्वळ महसुलाची आवश्यकता | | | | ५०५.४० | | | | १५०८.२९ |
| विज विक्रीतुन मिळालेला महसूल | | | | ४४९.३२ | | | | १३३२.५३ |
| फरक | | | | -५६.०८ | | | | -१७५.७६ |

१. याचिकेत दिल्याप्रमाणे कोळश्याची कमतरता आणि खान्देश विभागात झालेली अतिवृष्टी ही कारणे विचारात न घेता प्रमाणकानुसार केली आहे.

## :: प्रार्थना ::

**माननिय आयोगाला सविनय विनंती आहे की:**

१) भुसावळ संच क्र.४ व ५ प्रकल्पाचा भांडवली खर्च आणि आ.व. २०१२-१३ ते आ.व.२०१५-१६ च्या याचिकेत सादर केलेल्या विजदराला मान्यता द्यावी.

२) महानिर्मितीने याचिकेत सांगितल्याप्रमाणे आ.व. २०१२-१३ करीता कोळश्याची कमतरता/कमी उष्मांक मिळणे आणि अतिवृष्टी विचारात घेवून आ.व. २०१२-१३ व २०१३-१४ च्या समायोजनास मान्यता द्यावी.

३) याचिकेत दिल्या प्रमाणे महावितरण कडून तात्पूरत्या स्थिर आकाराची वसूली उशीरा झाल्यामूळे त्यावरील अनुषंगिक खर्च मान्य करावा.

४) आ.व.२०१२-१३ व २०१३-१४ च्या समायोजन रकमेवर महावितरण कंपनी कडून प्रत्यक्ष वसूली सुरू होईपर्यंत अनुषंगिक खर्च वसूलीची अनुमती द्यावी.

५) या याचिकेतील त्रृटी क्षमापित कराव्यात आणि आवश्यकते प्रमाणे अतिरिक्त माहिती सादर करण्यास महानिर्मितीला परवांनगी द्यावी.

६) महानिर्मितीला तात्पूरता वीजदर आणि मान्य केलेला अंतीम वीजदर या मधील तफावतीच्या रक्कमेचा आदेशाच्या तारखेपासून तीन समान मासीक हप्त्यात महावितरण कडून वसूल करण्याची परवांनगी द्यावी.

७) महानिर्मितीच्या प्रार्थनेप्रमाणे मान्य केलेल्या वीज आकाराची देयके देण्याविषयी महावितरण कंपनीला योग्य ते निर्देश द्यावेत.

८) याचिकाकर्त्याला अंतीम वीजदर ठरवितांना वापरलेले एक्सेल मॉडेल द्यावे ही विनंती.

९) मा.आयोगाने यथायोग्य पुढील आदेश द्यावे.